प्रकरण पाचवे

"माधवनगर कॉटन मिल्स् - अभ्यास नमुन्यातील कामगारांच्या खर्च बाबींचा अभ्यास"

प्रकरण पाचवे

"माधवनगर कॉटन मिल्स - अभ्यास नमुन्यातील कामगारांच्या खर्च बाबींचा अभ्यास"

प्रास्ताविक :

कामगारांच्या आर्थिक - सामाजिक स्थितीची कल्पना येण्यासाठी कामगारांची आर्थिक बाजू अगोदर समजणे जसे महत्त्वाचे असते तसेच कामगाराकडून केल्या जात असलेल्या खर्चाची माहिती होणे अत्यावश्यक असते. निव्वळ उत्पन्नावरून राहणीमानाच्या दर्जाची कल्पना करता येत नाही. मिळणारे उत्पन्न नेमके कशावर खर्च होते याला उत्पन्नापेक्षाही अधिक महत्व असते. व्यक्तीच्या राहणीमानावर व्यक्तीच्या उत्पन्नाबरोबरच ती राहात असलेले वातावरण, सुधारणांवरील खर्च, व्यक्तीच्या सवयींवरील खर्च, शिक्षणांवरील खर्च, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, रूढी-परंपरा, सामाजिक, धार्मिक संस्था अशा असंख्य घटकांचा प्रभाव पडतो. त्यामुळे राहणीमानाचा दर्जा ठरविणारे नेमके घटक सांगता येत नाहीत. मात्र तरीही व्यक्ती राहणीमानावर जो खर्च करते त्याला खर्चातील क्रमवारी, खर्चाचे प्रमाण, आवश्यक गरजांना दिले जाणारे महत्व, सवयींवरील खर्च, कामगाराचा बचतीबाबतचा दृष्टीकोन या बाबींना महत्व प्राप्त होते. त्यावरून व्यक्तीचा राहणीमानाचा दर्जा लक्षात येतो. त्याची समाजातील पत समजणे सोपे जाते. कामगाराचा कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन समजतो.

सदर अभ्यासासाठी माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या आर्थिक - सामाजिक स्थितीची कल्पना येण्याच्या दृष्टीने निवड कामगारांकडून

भरून घेतलेल्या मुलाखत पत्रिकेत कामगाराच्या कौटुंबिक खर्चाचा भाग समाविष्ठ केलेला आहे. त्यामध्ये अन्न, भाजी, जळण, औषध, शिक्षण.... अशा बाबींबरोबरच कामगारांच्या सवयी उदा. धुम्रपान, मद्यपान, पान-तंबाखू अशा बाबींवर होणाऱ्या खर्चाची माहिती निवड कामगारांकडून मिळविली आहे. सदर प्रकरणात या बाबींवरून कामगारांच्या आर्थिक - सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

(अ) निवड कामगारांच्या आवश्यक खर्चानुसार वर्गीकरण :

१.१ अन्नावरील खर्चानुसार वर्गीकरण -

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुख्य तीन गरजा. म्हणजे अन्नाची गरज मानवाची मुलभूत गरज असून तिच्याशिवाय जगणे अशक्य आहे. त्यामुळे व्यक्ती मिळवती असो अगर नसो आपली अन्नाची गरज भागविली जाऊन नंतर इतर गरजांना स्थान दिले जाते. सदर गिरणीतील कामगार अन्नावर करीत असलेला खर्च --

तक्ता क्र. ५.१

अन्नावरील खर्चानुसार वर्गीकरण

अन्नावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
० - १००	-	-
१०१ - २००	३	९.१
२०१ - ३००	१५	४५.५
३०१ - ४००	१४	४२.४
४०१ - ५००	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

सर्व प्रकारचे धान्य, डाळी, तेल, मीठ, मसाला या सर्वांचा समावेश अन्नात होतो. तक्ता क्र. ५.१ वरून माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या अन्नावरील खर्चाची कल्पना येते. ३३ पैकी ३ कामगारांचा अन्नावर दरमहा १०१ ते २०० रुपये खर्च होतो. इतका खर्च करणारे गिरणीतील शेकडा ९.१ कामगार आहेत. १५ कामगारांचा २०१ ते ३०० रु. खर्च होतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ४५.५ आहे. १४ कामगारांचा ३०१ ते ४०० रुपयांपर्यंत खर्च होतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ४२.४ आहे. तर एका कामगाराचा ४०१ ते ५०० रु. खर्च होतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. सदर गिरणीत २०१ ते ४०० रु. खर्च करणारे २९ कामगार आहेत. म्हणजेच शेकडा ८७.९ कामगार आहेत.

१.२

तक्ता क्र. ५.२

भाजीवरील खर्चानुसार वर्गीकरण

भाजीवरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
भाजीवर खर्च नाही	२	६.१
४१ ते ६०	४	१२.१
६१ ते ८०	३	९.१
८१ ते १००	१६	४८.५
१०१ ते १२०	८	२४.२
एकूण ..	३३	१००.०

वरील तक्ता क्र. ५.२ नुसार निवड कामगारांचा भाजीवरील खर्च लक्षात येतो. ३३ कामगारांपैकी २ कामगारांच्या घरी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय असल्याने भाजीवर त्यांना खर्च करावा लागत नाही. अशा काम-कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. ४ कामगारांना भाजी-वर दरमहा ४१ ते ६० रु. खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १२.१ आहे. ३ कामगारांना ६१ ते ८० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. १६ कामगारांना ८१ ते १०० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ४८.५ आहे. तर ८ कामगारांना १०१ ते १२० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणी-तील शेकडा प्रमाण २४.२ आहे.

भाजीच्या सातत्याने वाढत असलेल्या किंमतीमुळे कामगाराला आपल्या खर्चाचा मेळ घालताना अडचणीचे ठरत आहे.

१.३ जळणावरील खर्चानुसार वर्गीकरण -

तक्ता क्र. ५.३

जळणावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
४१ ते ६०	९	२७.३
६१ ते ८०	१०	३०.३
८१ ते १००	११	३३.३
१०१ ते १२०	१	३.०
१२१ ते १४०	२	६.१
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.३ वरून निवड कामगारांचा जळणावरील खर्च लक्षात येतो. ३३ निवड कामगारांपैकी ९ कामगारांचा जळणावर दरमहा ४१ ते ६० रू. खर्च होतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २७.३ आहे. १० कामगारांचा ६१ ते ८० रू. खर्च होतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३०.३ आहे. ११ कामगारांचा ८१ ते १०० रू. खर्च होतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३३.३ आहे. एका कामगाराचा १०१ ते १२० रू. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. तर २ कामगारांचा १२१ ते १४० रू. खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे.

अलिकडे वाढत्या शहरीकरणामुळे, नोकरीमुळे खेडयाकडून शहराकडे स्थलांतरीत होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शेतातील चिपाडांचा वापर जळण म्हणून फारसा होत नाही. लाकडाच्या वाढत्या किंमती, रॉकेलचे वाढते दर यामुळे जळणावरील खर्च सातत्याने वाढत आहे.

१.४ दूधावरील खर्चानुसार वर्गीकरण -

तक्ता क्र. ५.४

दूधावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
अजिबात खर्च नाही	३	९.१
४१ ते ६०	२	६.१
६१ ते ८०	२	६.१
८१ ते १००	१७	५१.५
१०१ ते १२०	-	-
१२१ ते १४०	४	१२.१
१४१ ते १६०	५	१५.१
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.४ वरून निवड कामगारांचा दूधावरील मासिक खर्च लक्षात येतो. ३३ निवड कामगारांपैकी ३ कामगारांच्या घरी दुभती जनावरे असल्याने दुधावर खर्च होत नाही. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. प्रत्येकी २ - २ कामगार दरमहा दुधावर ४१ ते ६० रु. आणि ६१ ते ८० रु. खर्च करतात. अशा दोन्ही गटातील कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ६.१ आहे. १७ कामगार ८१ ते १०० रु. खर्च करतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ५१.५ आहे. म्हणजे गिरणीतील जवळ जवळ निम्मे कामगार दुधावर ८१ ते १०० रुपयापर्यंत खर्च करतात. ४ कामगार १२१ ते १४० रु. पर्यंत खर्च करतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १२.१ आहे. तर ५ कामगार १४१ ते १६० रु. पर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.१ आहे.

दुधाचे वाढते दर पाहता कामगार रोज अर्धा लिटर दुधही खरेदी करु शकत नाहीत. त्यामुळे कामगाराच्या खाण्यात, मुलांना पिण्यास दूध ही बाब अशक्यप्राय ठरते.

५.१.५ औषधावरील खर्चानुसार वर्गीकरण -

औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना आपला अधिकांश वेळ यंत्राच्या सानिध्यात घालवावा लागतो. त्यामुळे अपघात, अपंगत्व या समस्या बऱ्याचदा उद्भवतात. शिवाय आजारपणाची समस्याही सतत त्रस्त करीत असते. कामगारांना सामाजिक सुरक्षा प्राप्त करुन देण्याच्या उद्देशाने भारतात विविध कायदे करण्यात आले आहेत. त्या सर्वात राज्य विमा कायदा हा सर्वात महत्वाचा. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांना

या कायद्याचा लाभ मिळतो. कामगारांना त्या कायद्यानुसार वैद्यकीय लाभ प्राप्त होतो. त्यामुळे औषधोपचारावर कामगारांना स्वत:साठी व कुटुंबातील व्यक्तींसाठी फारसा खर्च करावा लागत नाही. सदर गिरणीतील कामगारांकडून औषधोपचारावर होणाऱ्या खर्चानुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे-

तक्ता क्र. ५.५

औषधावरील खर्चानुसार वर्गीकरण

औषधावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
ई.एस्.आय्.कडील सोय	१९	५७.६
२१ ते ४०	२	६.१
४१ ते ६०	९	२७.३
६१ ते ८०	-	-
८१ ते १००	१	३.०
१०१ ते १२०	१	३.०
१२० वरील ..	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.५ वरुन ३३ निवड कामगारांच्या औषधावरील खर्चाची कल्पना येते. गिरणीतील कामगार कर्मचारी राज्य विमा कायद्यानुसार अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय सोयींचा लाभ घेतातच शिवाय इतर अन्यत्रही औषधावर खर्च करतात असे दिसते. निवड कामगारांपैकी १९ कामगार राज्य-विमा कायद्यानुसार उपलब्ध असलेल्या दवाखान्यात (ई.एस्.आय्.) औषधोपचाराचा लाभ घेत असल्याने त्यासाठी वेगळा खर्च त्यांना करावा लागत नाही.

अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ५७.६ आहे. २ कामगारांना मासिक २१ ते ४० रु. खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. ९ कामगारांना मासिक ४१ ते ६० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २७.३ आहे. मासिक ८१ ते १०० रु., १०१ ते १२० रु. आणि १२० रु. पेक्षा जास्त खर्च येणाऱ्या कामगारांची संख्या प्रत्येकी १-१ आहे. आणि त्यांचे गिरणीतील कामगारांशी शेकडा प्रमाण प्रत्येकी ३-३ आहे.

गिरणीतील ३३ पैकी १९ कामगार कर्मचारी राज्य विमा कायद्यानुसार मिळणाऱ्या सोयीचा लाभ घेतात तर १४ कामगार त्या सोयी व्यतिरिक्त अन्य खर्च औषधोपचारावर करतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ४२.४ आहे.

१.६ कपड्यांवरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.६

कपड्यांवरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
२१ ते ४०	४	१२.१
४१ ते ६०	१६	४८.५
६१ ते ८०	११	३३.४
८१ ते १००	१	३.०
१०१ ते १२०	-	-
१२१ ते १४०	-	-
१४१ ते १६०	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

अन्न, वस्त्र, निवारा या तीन आवश्यक गरजांमधील कपडे ही द्वितीय क्रमांकाची गरज आहे. त्यामुळे ती पूर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला धड-पड करावी लागते. माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांचा कपड्यां-वरील मासिक खर्च तक्ता क्रमांक ५.६ वरून लक्षात येतो. ४ कामगारांना महिन्याला २१ ते ४० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १२.१ आहे. १६ कामगारांना मासिक ४१ ते ६० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ४८.५ आहे. ११ कामगारांना मासिक ६१ ते ८० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३३.४ आहे. तर प्रत्येकी एका कामगाराला ८१ ते १०० रु. १४० ते १६० रु. खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ३-३ आहे.

१.७ <u>घरभाड्यावरील खर्चानुसार वर्गीकरण</u> -

मानवाच्या अन्न, वस्त्र निवारा या तीन मुलभूत गरजांपैकी घर (निवारा) ही तिसरी आवश्यक गरज आहे. नोकरी निमित्ताने स्वत:च्या गांवापासून दूर आलेल्या कामगारांना भाड्याच्या घरात राहावे लागते. त्या-मुळे भाड्यापोटी काही रक्कम आपल्या पगारातून त्यांना खर्च करावी लागते. घरभाड्याच्या दरात होत असलेल्या प्रचंड वाढीमुळे कामगारांना घरभाड्यापोटी अधिक रक्कम खर्च करावी लागते. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांचा भाड्यापोटी करावा लागणारा खर्च पुढील प्रमाणे दिसून येतो.

तक्ता क्र. ५.७

घरभाड्यावरील खर्चानुसार वर्गीकरण

घरभाड्यावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
घरभाडे नाही (स्वत:चे घर)	१७	५१.५
१ ते १००	२	६.१
१०१ ते १२५	२	६.१
१२६ ते १५०	८	२४.२
१५१ ते १७५	१	३.०
१७६ ते २००	२	६.१
२०१ वरील ...	१	३.०
एकूण ..	३३	१००.००

टेबल क्र. ५.७ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या घरभाड्यावरील खर्चाची कल्पना येते. ३३ पैकी १७ कामगार स्वत:च्या घरात राहात असल्याने घरभाड्यापोटी त्यांना काही खर्च करावा लागत नाही. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ५१.५ आहे. १०० रु. पर्यंत आणि १०१ ते १२५ रु. पर्यंत भाडे भरावे लागणारे प्रत्येकी २-२ कामगार आहेत. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ६.१ - ६.१ आहे. १२६ रु. ते १५० रु. पर्यंत रक्कम खर्च करावी लागणारे ८ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.२ आहे. १५१ ते १७५ रु. पयत खर्च करावा लागणारा एक कामगार असून अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमांण ३ आहे.

५.८ शिक्षणावरील खर्चानुसार वर्गीकरण :

व्यक्ती विकासाचा महत्त्वाचा खर्च म्हणून शैक्षणिक खर्चाला महत्व प्राप्त होते. शिक्षणाने माणसाला माणूसपण प्राप्त होते. याची जाणिव आज जवळ जवळ प्रत्येकाला झालेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील व्यक्ती असो अगर शहरी भागातील असो, गरिब असो अगर श्रीमंत प्रत्येकजण आपल्या मुलांच्या शिक्षणाला महत्व देत आहे. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांचा शिक्षणावरील मासिक खर्च पुढीलप्रमाणे दिसून येतो.

तक्ता क्र. ५.८

शिक्षणावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
००	६	१८.२
१ ते २०	६	१८.२
२१ ते ३०	९	२७.३
३१ ते ४०	९	२७.३
४१ ते ५०	२	६.०
५१ पेक्षा जास्त	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.८ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या शिक्षणावरील खर्चाची कल्पना येते. कामगार शिक्षणाला महत्व देतात याचीही जाणिव होते. ३३ पैकी ६ कामगारांची मुले अगदीच लहान अगर

अगदीच मोठी असल्याने, शिक्षण घेणारे घरात कोणी नसल्याने शिक्षणावर खर्च नाही. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. मासिक २०/- रु. पर्यंत खर्च करणाऱ्या कामगारांची संख्या ६ असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. दरमहा २१ ते ३० रु. आणि ३१ ते ४० रु. खर्च येणारे प्रत्येकी ९-९ कामगार आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी २७.३ आहे. २ कामगारांना दरमहा ४१ ते ५० रुपये खर्च करावा लागतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. तर ५०/- रुपयापेक्षा जास्त खर्च करावा लागत असलेला एक कामगार असून अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे.

ज्या कामगारांची मुले ९ वी, १० वीत आहेत. त्यांच्या शिकवण्यावरील आणि १०वीच्या पुढे असणाऱ्यांचा पास वरील खर्च दरमहा करावा लागतो असे कामगारांकडून मुलाखतीच्या वेळी समजले.

१.९ करमणूकीवरील (आदरतिथ्य) खर्चानुसार वर्गीकरण -

तक्ता क्र. ५.९

करमणूक खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१ ते २०	२	६.१
२१ ते ४०	४	१२.१
४१ ते ६०	२२	६६.६
६१ ते ८०	५	१५.२
एकूण ..	३३	१००.०

सिनेमा, नाटक, क्लापथक अगर अन्य करमणूक कार्यक्रमावर अगर पाहुणे, मित्रमंडळींच्या आदर तिथ्यावर कामगारांना खर्च करावा लागतो. मुले अगर कुटुंबातील अन्य व्यक्तींना असलेल्या आवडीनुसार हा खर्च बदलतो. तक्ता क्र. ५.९ वरून माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या करमणूकीवरील खर्चाची कल्पना येते. ३३ निवड कामगारांपैकी २ कामगारांना दरमहा २०/- रु. पर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. ४ कामगारांना २१ ते ४० रु. पर्यंत खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १२.१ आहे. २२ कामगारांना ४१ ते ६० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६६.६ आहे. तर ५ कामगारांना ६१ ते ८० रु. खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे.

५.१० प्रवासावरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१०

प्रवासी खर्च (रु)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१ ते २०	१	३.०
२१ ते ४०	७	२१.२
४१ ते ६०	१७	५१.५
६१ ते ८०	५	१५.२
८१ ते १००	१	३.०
१०१ पेक्षा जास्त	२	६.१
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र.५.१० वरून माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या प्रवासावरील खर्चाची कल्पना येते. सदर गिरणीतील फक्त शेकडा १२.१ कामगार स्थानिक आहेत. ४२.४ कामगार माधवनगर जवळपासूचे आहेत. तर ४५.५ कामगार लांबून आलेले आहेत. त्यामुळे अशा कामगारांना गांवी भेट देण्यावरील खर्च वारंवार करावा लागतो. तसेच इतर कामगारांनाही काही ना काही कारणाने कामगार अगर त्यांच्या कुटुंबीयांना प्रवास करावा लागत असल्याने त्यांचा प्रवासावर खर्च होतो. ३३ निवड कामगारांपैकी एका कामगाराला दरमहा २० रूपयापर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणातील शेकडा प्रमाण ३.० आहे. ७ कामगारांना २१ ते ४० रू.पर्यंत खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २१.२ आहे. १७ कामगारांना ४१ ते ६० पर्यंत खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ५१.५ आहे. ५ कामगारांना ६१ ते ८० रू. पर्यंत खर्च येतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. एका कामगाराला ८१ ते १०० रू. पर्यंत खर्च येतो. त्याचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. तर १०० रू.पेक्षा अधिक खर्च येणारे २ कामगार आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ६.१ आहे.

१.११ सण व इतर धार्मिक कार्यक्रमावरील खर्चानुसार वर्गीकरण -

तक्ता क्र.५.११

सण व धार्मिक कार्यक्रमावरील खर्च (रूपये)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
२१ ते ४०	२०	६०.६
४१ ते ६०	११	३३.४
६१ ते ८०	१	३.०
८१ ते १००	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

सर्वसाधारणपणे प्रत्येक महिन्याला कोणता ना कोणता सण असतोच. सणाचे स्वरूप भिन्न जाती जमातीत भिन्न असले तरी सणासाठी म्हणून खर्च करावाच लागतो. अगर धार्मिक कार्यक्रमासाठी, जत्रेवरील खर्च करावाच लागतो. माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या सणावरील खर्चाची कल्पना तक्ता क्र. ५.११ वरुन येते. निवड कामगारांपैकी २० कामगारांना दरमहा २१ ते ४० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६०.६ आहे. ११ कामगारांना दरमहा ४१ ते ६० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३३.४ आहे. तर प्रत्येकी १-१ कामगाराला दरमहा ६१ ते ८० रु. आणि ८१ ते १०० रु. खर्च येतो. त्याचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ३-३ आहे.

५.१२ कर्ज परतफेडीच्या खर्चानुसार वर्गीकरण :

भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात वाढतो, कर्जात मरतो असा विचार आजही भारतीय शेतकऱ्याला लागू पडतो. औद्योगिक क्षेत्रातील कामगारालाही थोडया बहुत फरकाने हा विचार लागू पडतो असे म्हणावे लागेल. वाढत्या भाववाढीच्या काळात कामगाराला मिळणारे वेतन अल्प. त्यात पुन्हा कामगाराच्या गैरहजेरीच्या वाढत्या प्रमाणामुळे पगार कमी. त्या पगारात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविणे अशक्य. अशावेळी कामगारापुढे कर्जाशिवाय अन्य मार्ग नसतो. एकदा कामगार कर्जाच्या चक्रात अडकला म्हणजे त्याला बाहेर पडण्यास मार्ग नसतो. प्रत्येक वेळी येणारा पगार कर्जाच्या परतफेडीसाठी आणि व्याजासाठीच मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याने पुन्हा कर्जाशिवाय पर्याय नसतो.

१.१२.१ कर्ज घेण्याच्या आवश्यकतेनुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१२

कर्जाबाबतचा विचार	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
कर्ज घेण्याची नेहमी आवश्यकता आहे.	३२	९७
कर्ज घेण्याची नेहमी आवश्यकता नाही.	१	३
एकूण ..	३३	१००

तक्ता क्र. ५.१२ वरून माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांच्या कर्जाबाबतच्या विचाराची कल्पना येते. कामगारांना कर्ज घेण्याची नेहमी आवश्यकता भासते का ? असे विचारले असता ३२ कामगारांच्या मते कर्ज घेण्याची नेहमी आवश्यकता भासते. म्हणजेच गिरणीतील शेकडा ९७ कामगारांना कर्ज काढण्याची आवश्यकता नेहमी भासते. तर एका कामगाराला कर्ज घेण्याची आवश्यकता नेहमी भासत नाही. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. या कामगाराच्या मते क्वचित प्रसंगी मी सहकारी सोसायटीचे कर्ज काढतो अन्यथा नाही.

१.१२.२ कर्ज काढण्याच्या कारणावरुन वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१३

	कर्ज काढण्याचे कारण	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१)	प्लॉट खरेदी व घरबांधणी	७	२१.२
२)	घरगुती खर्च भागविण्यास	१५	४५.५
३)	लग्न कार्यासाठी	४	१२.१
४)	वाहन खरेदीसाठी	३	९.१
५)	औषधोपचारासाठी	२	६.१
६)	कर्ज परतफेडीसाठी	१	३.०
७)	इतर कारणासाठी	१	३.०
	एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.१३ वरुन माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांच्या कर्जाच्या कारणाची कल्पना येते. ३३ निवड कामगारांपैकी सर्व कामगारांना कर्ज काढण्याची आवश्यकता भासते. कर्ज काढण्याचे कारण वेगवेगळ्या कामगाराचे वेगवेगळे आहे. निवड कामगारांपैकी ७ कामगार प्लॉट खरेदी व घरबांधणीसाठी कर्ज घेतात. अशा कारणासाठी कर्ज घेणाऱ्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २१.२ आहे. १५ कामगारांना घरगुती खर्च भागविण्यासाठी कर्ज काढण्याची गरज भासते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण सर्वाधिक म्हणजे ४५.५ आहे. ४ कामगारांना लग्न कार्यासाठी कर्जाची गरज भासते. त्यांचे गिरणीतील कामगारांमध्ये शेकडा प्रमाण १२.१ आहे. ३ कामगारांना वाहन खरेदीसाठी कर्ज काढण्याची आवश्यकता भासते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. २ कामगारांना औषधो-

पचारासाठी कर्जाची आवश्यकता भासते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. एका कामगाराला कर्ज परतफेडीसाठी कर्ज काढण्याची आवश्यकता भासते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३.० आहे. तर इतर अन्य कारणासाठी अगर अचानक समस्येसाठी एका कामगाराला कर्ज काढावे लागते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे.

१.१२.३ कर्ज घेण्याच्या मार्गावरुन वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१४

	कर्जाचे मार्ग	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१.	सावकार	५	१५.२
२.	पतपेढी	-	-
३.	सहकारी सोसायटी	२४ [३३]	७२.७ [१००]
४.	बँक	३	९.१
५.	नातेवाईक	१	३.०
	एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.१४ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या कर्जाच्या कारणाची कल्पना येते. ३३ निवड कामगारांपैकी सर्व कामगारांना कर्ज काढण्याची आवश्यकता भासते. गिरणीतील सर्व कामगार तिचे सभासद आहेत. कर्ज घेणारे हे ३३ कामगार सर्वच्या सर्व सहकारी सोसायटीकडून

कर्ज घेतात. म्हणजेच गिरणीतील १०० टक्के कामगार सहकारी सोसायटीद्वारे कर्ज घेतात. त्या व्यतिरिक्त अन्य मार्गांनी कामगार कर्ज काढतात. त्यामुळे कर्ज घेण्याच्या मार्गावरुन कामगारांचे वर्गीकरण पाहिल्यास ५ कामगार सावकारांकडून कर्ज घेतात. गिरणीतील अशा कामगारांचे शेकडा प्रमाण १५.२ आहे. २४ कामगार इतर कोणत्याही अन्य मार्गाचा अवलंब न करता केवळ सहकारी सोसायटीद्वारे कर्ज काढतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ७२.७ आहे. ३ कामगार बँकेकडून कर्ज घेतात. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर केवळ एक कामगार कर्ज काढण्यासाठी नातेवाईक मार्गाचा अवलंब करतो. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३.१ आहे.

म्हणजेच गिरणीतील नगण्य कामगार नातेवाईकांकडून कर्ज काढतात. सावकाराचा व्याजाचा दर अधिक असतो. तरीही गिरणीतील शेकडा १५.२ कामगार अजूनही सावकाराकडून कर्ज काढतात.

१.१२.४ <u>कर्ज परतफेडीच्या खर्चानुसार वर्गीकरण</u> :

<u>टेबल क्र. ५.१५</u>

कर्ज परतफेड (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१ ते २००	५	१५.१
२०१ ते ४००	५	१५.२
४०१ ते ६००	१०	३०.३
६०१ ते ८००	६	१८.२
८०१ ते १०००	५	१५.२
१००१ ते १२००	१	३.०
१२०१ ते १४००	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.१५ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या कर्ज परतफेडीची कल्पना येते. निवड कामगारांनी सर्वच्या सर्वांनी माधवनगर कॉटन मिल्स् एम्लॉईज को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. माधवनगर या सहकारी सोसायटीचे कर्ज घेतलेले आहे. त्या कर्जाची परतफेड कामगार आपल्या पगारातून करतात. कामगारांच्या पगारपत्रकावरुन जुलै, ९३ या महिन्यात कामगारांच्या कर्जाच्या कपातीची आकडेवारी सांख्किी विभागाकडून मिळविली. त्यानुसार निवड कामगारांपैकी ५ कामगारांच्या पगारातून २००/- रु. पर्यंत कर्ज परतफेड कपात होते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. अन्य ५ कामगारांच्या पगारातून २०१ ते ४०० रु. पर्यंत कपात होते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. १० कामगारांच्या पगारातून ४०१ ते ६०० रु. कपात होते. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३०.३ आहे. ६ कामगारांच्या पगारातून ६०१ ते ८०० रु. कपात होते. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. ५ कामगारांच्या पगारातून ८०१ ते १००० रु. कपात होते. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. १००१ ते १२०० रु. कपात होणारे आणि १२०१ ते १४०० रुपये कपात होणारे प्रत्येकी १-१ कामगार आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ३-३ आहे.

कामगारांच्या कर्ज परतफेडीच्या रकमा पाहिल्या की, कामगारांच्या हातात दरमहा किती अल्प रक्कम येत असेल याची कल्पना येते. गिरणीतील जवळ जवळ शेकडा ३९ ते ४० कामगार दरमहा ६०० रु. पेक्षा जास्त रकमेची कर्जपरतफेड आपल्या पगारातून करतात. याशिवाय बँका, नातेवाईक, सावकार यांच्याकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड वेगळीच. कारण सहकारी सोसायटी शिवाय गिरणीतील शेकडा १५.२ कामगार सावकाराकडून कर्ज घेतात. ९.१ कामगार बँकेकडून कर्ज घेतात, तर ३ कामगार नातेवाईकांकडूनही कर्ज घेतात.

१.१३ बचतीच्या प्रमाणानुसार वर्गीकरण :

१.१३.१ बचतीच्या दृष्टीकोनावरून वर्गीकरण -

तक्ता क्र. ५.१६

	बचतीबाबतचा दृष्टीकोन	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१)	बचत करणारे	१६	४८.५
२)	बचत न करणारे	१७	५१.५
	एकूण ..	३२	१००.०

तक्ता क्र. ५.१६ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांचा बचतीबाबतचा दृष्टीकोन लक्षात येतो. ३३ निवड कामगारांना तुम्ही बचत करु शकता का ? असा प्रश्न विचारला असता ३३ पैकी १६ कामगारांनी होकारार्थी उत्तर दिले. म्हणजेच गिरणीतील शेकडा ४८.५ कामगार अल्प का होईना पण बचत करण्याचा प्रयत्न करतात. तर १७ कामगारांनी बचत करु शकत नाही असे उत्तर दिले. म्हणजेच गिरणीतील शेकडा ५१.५ कामगार बचत करु शकत नाहीत. बचत करणारे कामगार मोठ्या प्रमाणावर बचत करु शकतात असे नाही. परंतु भविष्य काळात येणा-या अडचणींना खारीच्या वाट्याने का होईना पण तोंड देता यावे अशा हेतूने कामगार बचतीकडे पाहतात. त्यासाठी आपल्या पगारात होणा-या खर्चात काटछाट करून बचतीसाठी काही रक्कम शिल्लक ठेवतात.

१.१३.२ बचतीच्या स्वरूपावरून वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१७

बचतीचे स्वरूप	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
नियमित बचत	१३	८१.२
अनियमित बचत	३	१८.८
एकूण ..	१६	१००.०

माधवनगर कॉटन मिलमधील ३३ निवड कामगारांपैकी १६ कामगारांचा बचतीबाबतचा दृष्टीकोन इष्ट आहे. १६ पैकी १३ कामगार आपल्या पगारातून नियमित बचत करतात. बचत करू इच्छिणाऱ्या गिरणीतील शेकडा ४८.५ कामगारांमध्ये नियमित बचत करणारे शेकडा ८१.२ आहेत. तर ३ कामगार आपल्याला जमेल तशी अनियमित स्वरूपाची बचत करतात म्हणजेच शेकडा ४८.५ बचत करू इच्छिणाऱ्यांपैकी शेकडा १८.८ कामगारांची बचत अनियमित स्वरूपाची आहे.

१.१३.३ बचतीच्या मार्गानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१८

	बचतीचा मार्ग	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१.	भिशी	३	१८.८
२.	सहकारी बँकेत बचत खाते	१	६.२
३.	राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते	-	-
४.	मुदत ठेव	१	६.३
५.	सोने खरेदी	१	६.२
६.	इतर	१०	६२.५
	एकूण ..	१६	१००.०

तक्ता क्र. ५.१८ वरून माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांचा बचतीचा मार्ग लक्षात येतो. निवड कामगारांपैकी १६ कामगार बचत करू शकतात. त्यापैकी ३ कामगार बचतीसाठी भिशीचा मार्ग अवलंबतात. म्हणजे बचत करू शकणाऱ्या गिरणीतील कामगारांमध्ये शेकडा १८.८ कामगार भिशीचा मार्ग स्वीकारतात. तर प्रत्येकी १-१ कामगार सहकारी बँकेत बचत खाते उघडून, मुदत ठेव, सोने खरेदी इ. मध्ये बचत करतात. गिरणीतील बचत करणाऱ्यांच्यात अशा प्रकारची बचत करणाऱ्यांचे शेकडा प्रमाण प्रत्येकी ६.२ आहे. १० कामगार बचतीसाठी इतर मार्गाचा अवलंब करतात. त्यात प्रामुख्याने आयुर्विम्याचा मार्ग स्विकारणारे अधिक आहेत. गिरणीतील बचत करू शकणाऱ्यांमध्ये इतर बचतीचा मार्ग स्वीकारणारे शेकडा ६२.५ कामगार आहेत.

१.१३.४ बचतीच्या प्रमाणानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.१९

बचतीवरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
बचत न करणारे	१७	५१.५
१ ते २५	१	३.०
२६ ते ५०	८	२४.३
५१ ते ७५	-	-
७६ ते १००	१	३.०
१०१ ते १२५	३	९.१
१२६ ते १५०	१	३.०
१५१ वरील	२	६.१
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.१९ वरून माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांच्या बचतीवरील खर्चाचे स्वरूप समजते. निवडलेल्या ३३ कामगारांपैकी १७ कामगारांना आपल्या वेतनातून बचत करणे शक्य होत नाही. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ५१.५ आहे. १ ते २५ रु. पर्यंत बचत करणारा एक कामगार असून त्याचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. २६ ते ५० रु. बचत करू शकणारे ८ कामगार आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.३ आहे. ७६ ते १०० रु. बचत करणारा एक कामगार असून त्याचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३.० आहे. १०१ ते १२५ रु. बचत

करु शकणारे ३ कामगार असून त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. १२६ ते १५० रु. बचत करु शकणारा एक कामगार असून त्याचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. १५१ पेक्षा अधिक बचत करु शकणारे २ कामगार असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.१ आहे.

१.१४ इतर स्वरुपाच्या आवश्यक खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२०

इतर खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
००	३०	९१
१ ते ५०	१	३
५१ ते १००	१	३
१०१ वरील	१	३
एकूण ..	३३	१००

कामगारांकडून होणाऱ्या नित्त्याच्या खर्चाशिवाय इतर काही अन्य खर्च दरमहा होतो का ? असे विचारले असता निवड कामगारांकडून मिळालेली माहिती तक्ता क्र. ५.२० वरुन लक्षात येते. ३३ पैकी ३० कामगारांनी आहे तो खर्च पगारात करणे अशक्य आहे त्यामुळे इतर खर्च करणेच शक्य नाही असे उत्तर दिले. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९१ आहे. तर प्रत्येकी एक-एक कामगारांना १ ते ५० रु, ५१ ते १०० रु. आणि १००रु. पेक्षा जास्त इतर खर्च करावा लागतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३-३ आहे.

(ब) निवड कामगारांच्या सवयींवर होणाऱ्या खर्चानुसार वर्गीकरण :

कामगारांच्या उत्पन्नातून आवश्यक बाबींवर खर्च होतो तसेच कामगारांना असलेल्या काही सवयींमुळे त्या सवयींवर खर्च केला जातो. माणूस हा सवयीचा गुलाम आहे असे म्हटले जाते. त्यामुळे एकदा एखादी सवय लागली म्हणजे ती खर्चीक असो अगर नसो व्यक्ती तिच्या आहारी जाते. कारखान्यात यंत्रापुढे काम करणाऱ्या कामगारांना तिथले वातावरण, यंत्राचा गोंगाट यातून मानसिकदृष्टया बाहेर पडण्यासाठी काही वाईट सवयी लागतात. अगर कौटुंबिक खर्च भागत नसेल, अगर कौटुंबिक वातावरण योग्य नसेल अगर आवड म्हणून काही सवयी लागतात. त्यामुळे त्यावर काही खर्च करावाच लागतो. कामगारांना मासिक वेतनातून धुम्रपान, लॉटरी, हॉटेलिंग, सिनेमा अशा प्रकारच्या सवयींवर खर्च करावा लागतो. कामगारांच्या सामाजिक - आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना त्यांचे खर्चाचे अंदाजपत्रक अभ्यासणे गरजेचे ठरते. त्यामुळे कामगारांचा सवयींवरील खर्च अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

२.१ धुम्रपानावरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२१

धुम्रपान खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
००	१३	३९.४
१ ते १०	३	९.१
११ ते २०	९	२७.३
२१ ते ३०	५	१५.१
३१ ते ४०	३	९.१
एकूण ..	३३	१००.०

वरील तक्त्यावरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या सवयी-वरील खर्चाची कल्पना येते. माधवनगर कॉटन मिलमधील संशोधनासाठी निवडलेल्या ३३ कामगारांपैकी १३ कामगार धुम्रपानावर खर्च करीत नाहीत. तर २० कामगार खर्च करतात असे आढळले. हे प्रमाण गिरणीतील कामगारांच्यात शेकडा ३९.४ आहे. ३ कामगार दरमहा फक्त १० रूपयापर्यंत धुम्रपानावर खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ९.१ आहे. ९ कामगार ११ ते २० रूपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २७.३ आहे. ५ कामगार २१ ते ३० रूपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण १५.१ आहे. तर ३ कामगार ३१ ते ४० रूपयांपर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे.

म्हणजेच गिरणीतील ३९ ते ४० टक्के कामगारांना धुम्रपानाची सवय नाही. मात्र ६० ते ६१ टक्के कामगारांना धुम्रपानाची सवय असून त्यावर ते मासिक ४०/- रु. पर्यंत खर्च करतात.

२.२ लॉटरीवरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२२

लॉटरीवरील खर्च (रु)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
००	३०	९१
१ ते १०	१	३
११ ते २०	२	६
एकूण ..	३३	१००

नशीब अजमावणे आर एकदम मोठे होणे या हेतूंनी लोक ब-याचदा लॉटरीचा मार्ग स्वीकारतात. माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांची लॉटरी बाबत उदासीनता दिसते. ती तक्ता क्र. ५.२२ वरून लक्षात येते. कारण संशोधनासाठी निवडलेल्या ३३ पैकी ३० कामगारांनी लॉटरीवर अजिबात खर्च करीत नसल्याचे सांगितले. हे प्रमाण गिरणीतील कामगांच्यात शेकडा ९१ आहे. लॉटरीवर जास्तीत जास्त १० रूपयापर्यंत खर्च करणारा १ कामगार असून त्याचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. ११ ते २० रूपयापर्यंत लॉटरीवर खर्च करणारे २ कामगार असून त्यांचे शेकडा प्रमाण ६ आहे.

२.३ हॉटेलिंगवर होणा-या खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२३

हॉटेलिंग खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
००	३	९.१
१ ते १०	२	६.१
११ ते २०	८	२४.२
२१ ते ३०	१६	४८.५
३१ ते ४०	३	९.१
४१ ते ५०	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

तक्ता ५.२३ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांचा हॉटेलिंगवरील खर्च लक्षात येतो. निवड कामगारांपैकी ३ कामगार हॉटेलिंग-वर अजिबात खर्च करीत नाहीत. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ९.१ आहे. २ कामगार १० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणी-ती कामगारांच्यात शेकडा प्रमाण ६.१ आहे. ८ कामगार ११ ते २० रुपयां-पर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण २४.२ आहे. १६ कामगार २१ ते ३० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ४८.५ आहे. ३ कामगार ३१ ते ४० रुपयां-पर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ८.१ आहे. तर १ कामगार ४१ ते ५० रुपयापर्यंत खर्च करतो. त्याचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ३ आहे.

म्हणजेच गिरणीतील ९१ टक्के कामगार हॉटेलिंगवर खर्च करतात. ९ टक्के कामगार हॉटेलिंगवर खर्च करीत नाहीत. ९१ टक्के कामगारांपैकी ३० टक्के कामगार २० रुपयांपर्यंत खर्च करतात. ६१ टक्के कामगार २१ रु. पेक्षा जास्त आणि ५० रुपयापेक्षा कमी खर्च करतात.

२.४ <u>सिनेमावरील खर्चानुसार वर्गीकरण :</u>

तक्ता क्र.५.२४

सिनेमावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
० - ०	१५	४५.४
१ ते १०	२	६.१
११ ते १५	४	१२.१
१६ ते २०	३	९.१
२१ ते २५	६	१८.२
२६ ते ३०	३	९.१
एकूण ..	३३	१००.०

कामातील कंटाळा घालवणे, करमणूक या दृष्टीने लोक सिनेमा पाहण्यावर खर्च करतात. तक्ता क्र. ५.२४ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या सिनेमावरील खर्चाची कल्पना येते. माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांपैकी १५ कामगार सिनेमावर अजिबात खर्च करीत नाहीत. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ४५.४ आहे. २ कामगार १ ते १० रुपयापर्यंत सिनेमावर खर्च करतात. त्यांचे गिरणीतील शेकडा प्रमाणे ६.१ आहे. ४ कामगार ११ ते १५ रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण १२.१ आहे. ३ कामगार १६ ते २० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ९.१ आहे. ६ कामगार २१ ते २५ रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण १८.२ आहे. तर ३ कामगार २६ ते ३० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ३ आहे.

२.५ मद्यपानावरील खर्चानुसार वर्गीकरण :

सातत्याने तेच ते काम करणे कंटाळवाणे होते. यंत्राच्या आवाजाच्या गोंधळाने त्रास होतो, अगर घरगुती अडचणींना तोंड देण्याची कुवत नसते अशा अगर अन्य काही कारणांनी लोक ब-याचदा मद्यपानाकडे वळतात. एकदा मद्यपानाची सवय कामगाराला अगर व्यक्तीला लागली म्हणजे ब-याचदा तो त्या सवयीच्या आहारी जातो आणि त्यावर बराच पैसा खर्च करतो. केवळ पैसाच खर्च होतो असे नाही तर त्यामुळे कामगारांचे कुटुंब उध्वस्त होते.

तक्ता क्र. ५.२५

मद्यपानावरील खर्चानुसार वर्गीकरण

मद्यपानावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
०.०	१८	५४.५
११ ते २०	१	३.०
२१ ते ३०	२	६.१
३१ ते ४०	-	-
४१ ते ५०	५	१५.१
५१ ते ६०	२	६.१
६१ ते ७०	३	९.१
७१ ते ८०	२	६.१
एकूण ..	३३	१००.०

वरील तक्ता क्र. ५.२५ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या मद्यपानावरील खर्चाची कल्पना येते. माधवनगर कॉटन मिल मधील ३३ निवड कामगारांपैकी १८ कामगारांना मद्यपानाची सवय नाही. त्यामुळे या सवयीवर ते अजिबात रक्कम खर्च करीत नाहीत. यावरून गिरणीतील शेकडा ५४.५ कामगारांना मद्यपानाची सवय नाही. राहिलेल्या कामगारांपैकी १ कामगार मासिक ११ ते २० रुपयापर्यंत रक्कम मद्यपानावर खर्च करतो. त्याचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ३ आहे. २ कामगार २१ ते ३० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांमध्ये शेकडा प्रमाण ६.१ आहे. ५ कामगार ४१ ते ५० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण १५.१ आहे. २ कामगार ५१ ते ६० रुपयापर्यंत खर्च करतात.

त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ६.१ आहे. ३ कामगार ६१ ते ७० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांमध्ये शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर २ कामगार ७१ ते ८० रुपयापर्यंत रक्कम खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ६.१ आहे.

गिरणीतील शेकडा ५४.५ कामगार मद्यपानावर खर्च करीत नसले तरी ४५.५ टक्के कामगारांना मद्यपानाची सवय आहे. यापैकी ९.१ टक्के कामगार दरमहा ११ ते ३० रुपयापर्यंत रक्कम खर्च करतात. तर ३६.४ टक्के कामगार दरमहा ४१ ते ८० रुपयापर्यंत रक्कम खर्च करतात. यंत्रापुढे उभे राहून कंटाळा येतो, यंत्रातील उष्णतेचा त्रास होतो. या गोष्टी विसरण्यासाठी आपण मद्यपान कधीतरी करतो असे ब-याच कामगारांनी मुलाखतीच्यावेळी सांगितले.

२.६ पान-तंबाखूवरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२६

पान-तंबाखू वरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
०.०	३	९.१
१ ते १०	२	६.१
११ ते २०	८	२४.२
२१ ते ३०	१०	३०.३
३१ ते ४०	३	९.१
४१ ते ५०	७	२१.२
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.२६ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या पान-तंबाखू वरील खर्चाची कल्पना येते. माधवनगर कॉटन मिलमधील निवडलेल्या ३३ कामगारांपैकी फक्त ३ कामगारांना पान-तंबाखूची सवय नाही. म्हणजेच गिरणीतील ९.१ टक्के कामगारांना पान-तंबाखूची सवय नाही. म्हणजेच राहिलेल्या ९९ टक्के कामगारांना त्याची सवय आहे. २ कामगार या सवयी-वर मासिक १० रुपयापर्यंत खर्च करतात. हे प्रमाण गिरणीतील कामगारांच्यात शेकडा ६.१ आहे. ८ कामगार ११ ते २० रुपयापर्यंत या सवयीवर खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांमध्ये शेकडा प्रमाण २४.२ आहे. १० कामगार २१ ते ३० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण ३०.३ आहे. ३ कामगार ३१ ते ४० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांमध्ये शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर ७ कामगार ४१ ते ५० रुपयापर्यंत खर्च करतात. त्यांचे गिरणीतील कामगारांच्यात शेकडा प्रमाण २१.२ आहे.

२.७ जुगारावरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र.५.२७

जुगारावरील खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
० - ०	३१	९४.०
२१ ते ३०	१	३.०
३१ ते ४०	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.२७ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या जुगारावरील खर्चाची कल्पना येते. माधवनगर कॉटन मिलमधील निवड कामगारांपैकी ३१ कामगारांना जुगाराची सवय नाही. त्यामुळे या कामगारांकडून या सवयीवर अजिबात खर्च होत नाही. गिरणीतील कामगारांच्यात हे प्रमाण शेकडा ९४ आहे. प्रत्येकी १-१ कामगार २१ ते ३० आणि ३१ ते ४० रुपयापर्यंत खर्च करतो. त्यांचे गिरणीतील कामगारांशी शेकडा प्रमाण प्रत्येकी ३-३ आहे. म्हणजेच ९४ टक्के कामगारांना ही सवय नाही. ६ टक्के कामगारांना सवय आहे. ते २१ ते ४० रुपयापर्यंतच रक्कम या सवयीवर खर्च करतात.

२.८ इतर सवयीवरील खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२८

इतर खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
० - ०	३२	९७.०
११ - २०	१	३.०
एकूण ..	३३	१००.००

तक्ता क्र. ५.२८ वरुन माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या इतर खर्चाची कल्पना येते. कामगारांच्या सवयींवरील खर्चातील जुगार, मद्यपान, सिनेमा, लॉटरी यासारख्या खर्चाव्यतिरिक्त इतर अन्य काही सवयींवर होणारा खर्च ३३ निवड कामगारांपैकी ३२ कामगारांकडून काहीही होत नाही. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९७ आहे. तर एका कामगाराचा

इतर सर्वांवर ११ ते २० रु. पर्यंत खर्च होतो. हे प्रमाण गिरणीतील कामगारांच्यात शेकडा ३ आहे.

३.१ कामगारांच्या एकूण आवश्यक खर्चानुसार वर्गीकरण :

तक्ता क्र. ५.२९

कामगारांच्या एकूण आवश्यक खर्चाचे प्रमाण (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१००० ते १२००	५	१५.२
१२०१ ते १४००	८	२४.२
१४०१ ते १६००	५	१५.२
१६०१ ते १८००	८	२४.१
१८०१ ते २०००	५	१५.२
२००१ ते २२००	२	६.१
एकूण ..	३३	१००.०

तक्ता क्र. ५.२९ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या एकूण आवश्यक खर्चाची कल्पना येते. कामगारांच्या आवश्यक खर्चात अन्न, भाजी, जळण, शिक्षण, घरभाडे, कपडे, करमणूक, प्रवास, सण व धार्मिक कार्यक्रम, कर्ज परत फेड आणि बचत या घटकांचा समावेश केलेला आहे. ३३ निवड कामगारांपैकी १००१ ते १२०० रुपयापर्यंत खर्च येणारे ५ कामगार आहेत अशा खर्चाच्या कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. ८ कामगारांना

१२०१ ते १४०० रूपयापर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.२ आहे. ५ कामगारांना १४०१ ते १६०० रूपयापर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. ८ कामगारांना १६०१ ते १८०० रूपयापर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.१ आहे. ५ कामगारांना १८०१ ते २००० रु.खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.२ आहे. तर २ कामगारांना २००१ ते २२०० रूपयापर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे.

सदर आवश्यक खर्चात कर्जाच्या परतफेडीचा खर्च सर्वाधिक असल्याचे दिसून आले.

४.१ कामगारांच्या सवयींवरील एकूण खर्चानुसार वर्गीकरण :

कामगारांच्या सवयींवरील खर्चामध्ये प्रामुख्याने धुम्रपान, लॉटरी, हॉटेल, सिनेमा, मद्यपान, पानतंबाखू, जुगार आणि इतर खर्चाचा समावेश केलेला आहे. माधवनगर कॉटन मिलमधील कामगार सवयींवर करीत असलेल्या एकूण खर्चानुसार वर्गीकरण पुढील प्रमाणे -

तक्ता क्र. ५.३०

कामगारांच्या सवयींवरील एकूण खर्चानुसार वर्गीकरण

सवयीवरील एकूण खर्च (रु.)	कामगार संख्या	शेकडा प्रमाण
१ ते ५०	२	६.१
५१ ते ७५	७	२१.२
७६ ते १००	११	३३.३
१०१ ते १२५	६	१८.२
१२६ ते १५०	२	६.१
१५१ ते १७५	१	३.०
१७६ ते २००	३	९.१
२०१ ते २२५	१	३.०
एकूण ..	३३	१००.०

वरील तक्ता क्र. ५.३० वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या सवयींवरील एकूण खर्चाची कल्पना येते. ३३ निवड कामगारांपैकी २ कामगारांना सवयींवर ५०/- रु. पर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. ७ कामगारांना ५१ ते ७५ रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २१.२ आहे. ११ कामगारांना ७६ ते १०० रुपयापर्यंत खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३३.३ आहे. ६ कामगारांना १०१ ते १२५ रु. खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. २ कामगारांना १२६ ते १५० रुपये खर्च येतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. एका कामगाराला १५१ ते १७५ आणि एका कामगाराला २०१ ते २२५ रु. खर्च येतो. अशा कामगारांचे

गिरणीतील शेकडा प्रमाण प्रत्येकी ३ - ३ आहे. ३ कामगारांना १७६ ते २०० रु. खर्च येतो. अशा कामगारांचे शेकडा प्रमाण ९.१ आहे.

गिरणीतील निवडलेल्या ३३ कामगारांपैकी १३ कामगार दरमहा आपल्या सवयींवर १०० रुपयापेक्षा अधिक आणि २२५ रुपयापर्यंत खर्च करतात. म्हणजेच गिरणीतील शेकडा ३९.४ कामगार वाढत्या महागाईत पगार पुरत नसूनही १०० रुपयापेक्षा जास्त आणि जास्तीत जास्त २२५ रुपयांपर्यंत सवयीवर खर्च करतात.

५.१ कामगार खर्चाचे प्रातिनिधीक चित्र :

तक्ता क्र. ५.३१

अ.नं.	खर्चाचा प्रकार	सरासरी खर्च (रुपये)	एकूण खर्चाशी शेकडा प्रमाण
१.	अन्न	२८७.१२	१८.९
२.	भाजी	८५.३०	५.७
३.	जळण (गॅस)	८२.८७	५.४
४.	दूध	९४.५४	६.२
५.	औषधे	२७.५७	१.८
६.	कपडे	६२.१२	४.१
७.	घरभाडे	५३.३३	३.५
८.	शिक्षण	३२.२७	२.१
९.	करमणूक	१७.५७	१.२
१०.	प्रवास	१७.१२	१.१
११.	सण व इतर धार्मिक कार्यक्रम	४५.७५	३.०
१२.	कर्ज परतफेड	५६१.१८	३६.९
१३.	बचत	३९.१५	२.६
१४.	इतर आवश्यक खर्च	११.३६	०.७
१५.	धुम्रपान	१४.६९	०.९
१६.	लॉटरी	१.२१	०.१
१७.	हॉटेलिंग	२३.४८	१.६
१८.	सिनेमा	११.०६	०.७
१९.	मद्यपान	२२.८७	१.५
२०.	पान-तंबाखू	२९.०९	१.९
२१.	जुगार	१.९६	०.१
२२.	इतर सवयीवरील खर्च	०.४५	०.०२
	एकूण ..	१५२२.६६	१००.००

तक्ता क्र. ५.३१ वरून माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या खर्चाची कल्पना येते. कामगारांच्या प्रत्येक खर्च प्रकाराच्या एकूण खर्चाला निवड कामगार संख्येने भागून सदर गिरणीतील कामगारांचा सरासरी खर्च काढला आहे. ३३ कामगार हे सदर गिरणीचे नमुना पध्दतीने निवडलेले कामगार असल्याने त्यांच्या खर्चावरून काढलेला सरासरी खर्च हा सदर गिरणीतील सर्व कामगारांचा प्रातिनिधीक खर्च आहे. सदर गिरणीतील कामगार अन्नावर दरमहा सरासरी २८७.१२ रुपये खर्च करतात. भाजीवर ८५.९० रुपये, जळण (गॅस) ८२.८७ रुपये, दूध ९४.५४ रुपये, औषधे २७.५७ रुपये, कपडे ६२.१२ रुपये, घरभाडे ५३.३३ रुपये, शिक्षण ३२.२७ रुपये, करमणूक (आदरतिथ्य) १७.५७ रुपये, प्रवास १७.१२ रुपये, सण व इतर धार्मिक कार्यक्रम ४५.७५ रुपये, कर्ज परत फेड ५६१.१८ रुपये, बचत ३९.१५ रुपये, इतर आवश्यक खर्च ११.३६ रुपये, धुम्रपान १४.६९ रुपये, लॉटरी १.२१ रुपये, हॉटेलिंग २३.४८ रुपये, सिनेमा ११.०६ रुपये, मद्यपान २२.८७ रुपये पान-तंबाखू २९.०९ रुपये, जुगार १.९६ रुपये आणि इतर सवयींवरील खर्च ०.४५ रुपये.

सदर गिरणीतील कामगारांना आवश्यक व सवयींच्या गरजा भागविण्यास दरमहा सरासरी १५२२.६६ रुपये खर्च येतो. या खर्चात सर्वात अधिक खर्च कर्ज परतफेडीसाठी येतो. तो ५६१.१८ रुपये इतका आहे.

सदर गिरणीतील कामगारांच्या प्रत्येक प्रकारच्या खर्चाचे एकूण खर्चाशी शेकडा प्रमाण काढले. ते प्रमाण अन्न १८.९ टक्के, भाजी ५.७ टक्के, जळण ५.४ टक्के, दूध ६.२ टक्के, औषधे १.८ टक्के, कपडे ४.१ टक्के, घरभाडे ३.५ टक्के, शिक्षण २.१ टक्के, करमणूक १.२ टक्के, प्रवास १.१ टक्के, सण व इतर धार्मिक कार्यक्रम ३ टक्के, कर्जपरत फेड ३६.९ टक्के, बचत २.६ टक्के, इतर

आवश्यक खर्च ०.७ टक्के, धुम्रपान ०.९ टक्के, लॉटरी ०.१ टक्के, हॉटेलिंग १.६ टक्के, सिनेमा ०.७ टक्के, मद्यपान १.५ टक्के, पान तंबाखू १.९ टक्के, जुगार ०.१ टक्के आणि इतर सवयीवरील खर्च ०.०२ टक्के.

कामगारांच्या एकूण खर्चाशी काढलेल्या टक्केवारीनुसार अन्नावर १८.९ टक्के खर्च होतो. मात्र कर्ज परतफेडीवर ३६.९ टक्के खर्च होतो. म्हणजेच एकूण खर्चात कर्ज परतफेडीचे प्रमाण सर्वाधिक असून तुलनेने भाजी, शिक्षण, करमणूक, प्रवास यावरील खर्च कमी आहे.

....